# गोंडवाना विद्यापीठ ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./२९६६/२०२० दि. २६/१०/२०२०

**प्रति,**

१) प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

२) विभाग प्रमुख,
सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय :- विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभाग व सर्व संलग्नित महाविद्यालयांमध्ये ऑनलाईन वर्ग सुरु झाल्याबाबत व विद्यार्थ्याची उपस्थितीबाबत.

संदर्भ :- मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. युएनआय/२०२०/बैठक/विशि-१ /६०४४, दि. १८/०९/२०२०.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभाग व सर्व संलग्नित महाविद्यालयांमध्येऑनलाईन वर्ग सुरु झालेल्या अभ्यासक्रमाची माहिती तसेच विद्यार्थ्यांची उपस्थितीबाबतची व शैक्षणिक वेळापत्रक या संदर्भातील माहिती शिक्षण संचालनालयास सादर करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने उक्त संदर्भिय प्राप्त पत्रानुसारविद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभाग व सर्व संलग्नित महाविद्यालयांमध्ये काही ठिकाणी १० ते १५ टक्के तर काही ठिकाणी ६० ते ७० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती दिसून आलेली असून १०० टक्के विद्यार्थी उपस्थित राहण्याच्या दृष्टीकोनातून तसेच इतर कमतरता दुर करणेसंदर्भात आपल्या स्तरावर कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत वा करण्यात येत आहेत याबाबतचा सविस्तर अहवाल तात्काळ gug.registrar@gmail.comव gondwanaesst@gmail.com या ई-मेलवर पाठवून सहकार्य करावे. जेणेकरून अहवाल शिक्षण संचालनालयास/शासनास तात्काळ सादर करणे सोयीचे होईल.

सोबत - उक्त संदर्भिय पत्राची प्रत.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलीपी :-**

१) मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
३) मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४) आस्थापना विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१**

www.dhepune.gov.in Email- vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९.२६०५१५१२.२६१२४६३९ फॅक्स ०२०/२६१११९०३

क्रमांक- युएनआय/२०२०/बैठक/विशि-१/6044 दिनांक- सप्टेंबर

18 SEP 2020

प्रति,
१.कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२. प्राचार्य / संचालक,
सर्व शासकीय महाविद्यालये संस्था,महाराष्ट्र राज्य.

विषय- राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालय / संस्थेमध्ये ऑनलाईन वर्ग सुरू झाल्याबाबत व विद्यार्थ्यांची उपस्थितीबाबत..

संदर्भ-१.संचालनालयाचे समक्रमांक दि.२१ ऑगस्ट २०२० रोजीचे पत्र.
२.संचालनालयाचे समक्रमांक दि.२४ ऑगस्ट २०२० रोजीचे पत्र.
३. शासनाचे क्र.संकीर्ण-२०२० / प्र.क्र.१७७ / विशि-३ दि.१७ सप्टेंबर २०२० रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबतची संचालनालयाची संदर्भांकित पत्रे व शासनाचे दि.१७ सप्टेंबर २०२० रोजीचे संदर्भीय पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.(सोबत प्रत जोडली आहे)

राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्लित महाविद्यालये व शासकीय महाविद्यालये / संस्थेमध्ये ऑनलाईन वर्ग सुरू झालेल्या अभ्यासक्रमाची, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबतची तसेच शैक्षणिक वेळापत्रकाबाबतची आपल्याकडून प्राप्त माहिती संचालनालयाच्या संदर्भांकित पत्र क्र.०२ नुसार शासनास सादर करण्यात आलेली होती. त्यास अनुसरून शासनाने संदर्भांकित पत्र क्र.०३ नुसार जेथे कमतरता आहे त्यांचाकडून सविस्तर अहवाल मागविण्याचे निदेश दिलले आहेत.

संदर्भांकित शासन पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, राज्यातील काही विद्यापीठामध्ये तसेच शासकीय महाविद्यालयांमध्ये काही ठिकाणी १० ते १५% तर काही ठिकाणी ६० ते ७०% विद्यार्थ्यांची उपस्थिती दिसून येते. तरी १००% विद्यार्थी उपस्थित राहण्याच्या दृष्टीकोनातून तसेच इतर कमतरता दूर करणेसंदर्भात आपल्या स्तरावरून कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत वा करण्यात येत आहेत याबाबतचा सविस्तर अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- माहितीस्तव सादर-
१.मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

महाराष्ट्र शासन

क्रमांक-संकिर्ण-२०२०/प्र. क्र.१७७/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक १७ सप्टेंबर, २०२०

प्रति,

संचालक,
उच्च शिक्षण,
पुणे.

विषय:- राज्यातल अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालय/संस्थेमध्ये ऑनलाईन वर्ग सुरू झाल्याबाबत व विद्यार्थ्यांची उपस्थितीबाबत.

संदर्भ:- आपले पत्र क्र.युएनआय/२०२०/बैठक/विशि-१/५४८५ दि. २४/०८/२०२०.

महोदय,

राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयामध्ये व शासकीय महाविद्यालये/संस्थेमध्ये ऑनलाईन वर्ग सुरू झालेल्या अभ्यासक्रमाची, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबतची तसेच शैक्षणिक वेळापत्रकाची माहिती पाठविणेबाबतचा अहवाल आपण उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर पत्रावर अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी जेथे कमतरता आहे त्यांच्याकडून सविस्तर अहवाल मागविण्याचे असे निर्देश दिले आहेत.

तरी, अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल तात्काळ शासनास सादर करावा.

आपला,

(प्रविणकुमार पवार)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन